# संरक्षित ओलीत यशोगाथा

# अकोला क्लस्टर , ता.जि. अकोला

अकोला क्लस्टर मध्ये एकुण २३ गावे असुन सर्व गावाचा समावेश खारपाणपट्टा येतात. या क्लस्टर मधील शेत जमीन ही काळी कसदार असुन सुपीक आहे परंतु सोडीयम क्लाराईड चे प्रमाण जास्त असल्या कारणाने येथे ओलीताची शेती करता येत नाही. तसेच जमिनीखालील पाणी साठयामध्ये क्षारांचे प्रमाण जास्त असल्यामुळे बोअरवेल किंवा विहीरीचे पाणी शेतीसाठी व घरगुती वापरासाठी उपयुक्त नाही. एकंदरीत या भागातील शेती पुर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबुन आहे. त्यामुळे कधी कधी हाती आलेले पिक पावसाच्या एका पाण्यामुळे वाया जाते. अशा परिस्थितीमध्ये हाती आलेले पिक वाचविण्यासाठी त्या पिकाला एका पाण्याची फार गरज असते.



वरील सर्व परिस्थितीचा विचार करून कृषीसमृध्दी प्रकल्पाच्या माध्यमातुन लाभार्थ्यांच्या शेतात शेततळे खोदण्यासाठी संस्थेचे उपप्रकल्प व्यवस्थापक, व जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष अकोला चे पदाधिकारी यांनी गाव विकास समितीची सभा बोलावुन माहिती दिली. गाव विकास समितीने इच्छुक लाभार्थ्यांची निवड केली. त्या लाभार्थ्यांच्या शेतातजावुन पाहणी करून शेतीच्या आकारमानानुसार व उतारानुसार जागा निश्चित करून शेततळे खोदण्यात आले. प्रकल्पा अंतर्गत २३ गावामध्ये प्रकल्पामधुन एकुण १०५ शेततळे व कृषी विभागामार्फत ८८ असे एकुण १९३ शेततळयाची निर्मीती करून त्याची तलाठयामार्फत ७/१२ वर नोंद करून कृषीविभागामार्फत सदर लाभार्थ्यांना तुषार संच आणि डिझेल इंजिन ची व्यवस्था करून दिली. शेततळयासाठी ठेवण्यात आलेल्या बर्म व बांधावरील निरूपयोगी जागेचा उपयोग भाजीपाला, शेवगा तसेच ज्वारी लागवडीसाठी करण्यात आला.



वरील कामामुळे क्लस्टर मधील १२०० ते १५०० एकर क्षेत्र संरक्षित ओलिताखाली आले असुन उत्पन्नामध्ये दीडपट ते दुप्पट वाढ झाली आहे. लाभार्थ्यांना देण्यात आलेले तुषार संच व डिझेल इंजिन गरजुना भाडयाने दिल्यामुळे त्याचा अर्थिक फायदा होण्यास मदत झाली.



